# महाराष्ट्र विधानसभा

**पहिले अधिवेशन, २०२६**
**सन २०२६-२७ च्या अर्थसंकल्पीय मागण्या**
**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**
**गुरुवार, दिनांक १२ मार्च, २०२६**

## गृह विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - २९**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: बी-१**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २०५५, पोलीस**<br>**रूपये:- ३,२६,६८,९६,०८,०००/-**<br>**श्री. अमित झनक** |
| (१) | १३६१ | १० | रिसोड पो.स्टे.जऊळका (रे) पो.स्टे,मालेगांव पो.स्टे,मालेगांव पो.स्टे.येथे नविन प्रशासकीय ईमारत व पोलीस कर्मचा-यांसाठी रहिवासी इमारत निर्माण करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. आदित्य ठाकरे** |
| (२) | १३७२ | १० | वरळी मतदार संघातील वरळी पोलीस कॅम्प येथील इमारत क्र. १ ते ३६ या शासकीय पोलीस वसाहतीकरिता पूर्वी पाणीपुरवठ्यासाठी १० लाख लिटर क्षमतेचा सिमेंट काँक्रीटचा जलकुंभ उपलब्ध असलेला जलकुंभ धोकादायक स्थितीत असल्यामुळे तो निष्कासित करण्यात येणे, त्यानंतर तात्पुरता पर्याय म्हणून सिंटेक्सच्या पाण्याच्या टाक्या बसविण्यात आल्या असणे, परंतु सध्या बसविण्यात आलेल्या एकूण २० टाक्यांपैकी १२ टाक्या फुटलेल्या अवस्थेत असून त्यामुळे परिसरातील रहिवाशांना पाणीपुरवठ्याबाबत मोठ्या अडचणींचा सामना करावा लागणे,याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष,सदर ठिकाणी कायमस्वरूपी उपाययोजना म्हणून पूर्वीप्रमाणेच १० लाख लिटर क्षमतेचा सिमेंट काँक्रीटचा जलकुंभ उभारण्याची नितांत आवश्यकता, याकरिता विशेष निधी उपलब्ध करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपायोजना . |
| | | | **श्री. संजय देरकर** |
| (३) | १४५३ | १० | ग्रामीण व शहरी भागातील वाढती लोकसंख्या लक्षात घेणे, मोबाईल च्या माध्यमातून अनेक सायबर गुन्हे घडणे, गुन्हाचा शोध लावण्यासाठी स्वतंत्र पोलीस स्टेशन निर्माण होणे व सायबर चे आर्थिक फसवणूकीचे प्रकार वाढीस लागणे,गुन्हेगारी थांवण्यासाठी पोलिसांनी तातडीने गुन्हे घडणार नाही याची दक्षता घेणे, तसेच ग्रामीण भागत विकास कामे करताना सामाजिक क्षेत्रात कार्यकर्त यांना गावातील च गाव गुंड हे मारण्याच्या धमक्या देण्याचा प्रकार दिनांक ८,९ मार्च २०२६ रोजी गावातील अनेका समोर देणे धमक्या देणे, आणि गावात दहशत |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | निर्माण करण्याचा प्रयत्न वारंवार होणे या बाबतची चोकशी पोलिसांनी cdr च्या माध्यमातून व गुप्त चौकशी करून हा प्रकार चा मास्टर माईंड यांचा शोध घेणे व वेळोवेळो दहशत निर्माण करणार्यांचा शोध घेऊन त्यांचा बंदो्वस्त करून सामूहिक हल्ला होण्या पासून सरक्षण देण्याची कार्यवाही होणे भविष्यात संतोष देशमुख सारखा प्रकार किशोर देशमुख यांचा होणार नाही याची काळजी शासनाने घेणे गरजेचे असणे, असे प्रकार अनेक ठिकाणी घडत असताना पोलीस प्रशासनाणे घेणे असणे,त्याची गांभीर्याने दखल घेणे,असे दहशत निर्माण करणार्यांनाचा कडक बंदो्वस्त करणे गरजेचे असणे, असेच प्रकार या पुढे निर्माण होणार नाही याची दाखल शासनाने व पोलीस प्रशासनाने घेण्याची आवश्यकता असणे राज्यात या पुढे असे गंभीर प्रकार होणार नाही याची दक्षता घेण्याची आवश्यकता असणे या प्रकरणी राज्यात वाढत चाललेला असंतोष पाहता शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **डॉ. बाबासाहेब देशमुख** |
| (४) | १२५९ | १० | राज्यातील सुमारे साडेपाच हजारांहून अधिक पोलीस कर्मचाऱ्यांचे डीजी (DG) गृहकर्ज ऑगस्ट २०२३ पासून प्रलंबित असल्याची बाब निदर्शनास येत आहे. अनेक पोलीस कर्मचाऱ्यांनी घर खरेदीसाठी विकासकांना आगाऊ रक्कम दिलेली असून ती रक्कम त्यांनी उसनवारी करून किंवा कर्ज काढून भरलेली आहे.परंतु शासनाकडून डीजी गृहकर्ज मंजूर होण्यास विलंब होत असल्यामुळे सदर पोलीस कर्मचाऱ्यांवर आर्थिक संकट ओढवले आहे. कर्ज मंजुरी न झाल्यास विकासकांकडे दिलेली आगाऊ रक्कम गमावण्याची वेळ पोलीस कर्मचाऱ्यांवर येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. राज्याच्या कायदा व सुव्यवस्थेची जबाबदारी सांभाळणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांना स्वतःच्या घरासाठी गृह खात्याकडून दिल्या जाणारी पोलिसांचे कर्ज डीजी लोन तात्काळ सुरू करण्याबाबतची शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (५) | १२६१ | १० | सोलापूर जिल्ह्यातील सांगोला तालुक्यातील नाझरे, घेरडी, कोळा व महूद या भागांमध्ये लोकसंख्या व परिसराचा विस्तार मोठ्या प्रमाणावर वाढलेला आहे. या भागांमध्ये कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी स्वतंत्र पोलीस स्थानकांची आवश्यकता निर्माण झाली आहे. सध्या पोलीस स्थानकांचे अंतर जास्त असल्यामुळे नागरिकांच्या तक्रारींवर तातडीने कारवाई करण्यास अडचणी निर्माण होतात. त्यामुळे नाझरे, घेरडी, कोळा व महूद येथे नवीन पोलीस स्थानके स्थापन करून त्यासाठी आवश्यक इमारत बांधकाम व इतर पायाभूत सुविधा उभारणे आवश्यक आहे. यासाठी राज्य शासनाने पोलीस स्थानकांना प्रशासकीय मान्यता देऊन इमारत बांधकामासाठी आवश्यक निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (६) | १३१० | १० | सोलापूर जिल्ह्यातील सांगोला तालुक्यातील नाझरे, घेरडी, कोळा व महूद या भागांमध्ये लोकसंख्या व परिसराचा विस्तार मोठ्या प्रमाणावर वाढलेला आहे. या भागांमध्ये कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी स्वतंत्र पोलीस स्थानकांची आवश्यकता निर्माण झाली आहे. सध्या पोलीस स्थानकांचे अंतर जास्त असल्यामुळे नागरिकांच्या तक्रारींवर तातडीने कारवाई करण्यास अडचणी निर्माण होतात. त्यामुळे नाझरे, घेरडी, कोळा व महूद येथे नवीन पोलीस स्थानके स्थापन करून त्यासाठी आवश्यक इमारत बांधकाम व इतर पायाभूत सुविधा उभारणे आवश्यक आहे. यासाठी राज्य शासनाने पोलीस स्थानकांना प्रशासकीय मान्यता देऊन इमारत बांधकामासाठी आवश्यक निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (७) | १३११ | १० | सांगोला तालुका हा भौगोलिकदृष्ट्या विस्तीर्ण असून अनेक गावे, वाड्या-वस्त्या मोठ्या अंतरावर पसरलेल्या आहेत. तालुक्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्याची जबाबदारी सांगोला पोलीस स्टेशनवर आहे. परंतु सध्या सांगोला पोलीस स्टेशनकडे गुन्हेगारीचा शोध घेण्यासाठी तसेच तातडीने घटनास्थळी पोहोचण्यासाठी आवश्यक त्या प्रमाणात वाहने उपलब्ध नाहीत.वाहनांची संख्या अपुरी असल्यामुळे चोरी, दरोडे, भांडणे तसेच इतर गंभीर गुन्ह्यांच्या तपासासाठी पोलीस कर्मचारी वेळेत घटनास्थळी पोहोचू शकत नाहीत. परिणामी गुन्हेगारांचा माग काढताना अडचणी निर्माण होत आहेत आणि कायदा-सुव्यवस्था राखण्याच्या कामात अडथळे येत आहेत. सांगोला तालुक्यातील ग्रामीण भाग मोठ्या प्रमाणावर पसरलेला असल्यामुळे पोलीस यंत्रणेकडे आधुनिक व पुरेशा वाहनांची आवश्यकता आहे. त्यामुळे पोलीस प्रशासनाला जलद गतीने कारवाई करणे, गस्त वाढवणे आणि गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवणे शक्य होईल. म्हणून शासनाने सांगोला पोलीस स्टेशनसाठी तातडीने नवीन चारचाकी वाहने तसेच दुचाकी वाहने उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने तात्काळ करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (८) | १३१३ | १० | सांगोला तालुक्यातील अनेक गावांमध्ये ग्राम पोलीस पाटील पदे मोठ्या प्रमाणावर रिक्त आहेत. ग्राम पोलीस पाटील हे गावपातळीवर कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी तसेच पोलीस प्रशासनाला गुन्हेगारीविषयक माहिती देण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावत असतात.मात्र अनेक गावांमध्ये ही पदे रिक्त असल्यामुळे गावपातळीवर घडणाऱ्या घटनांची माहिती वेळेवर पोलीस प्रशासनापर्यंत पोहोचत नाही. त्यामुळे कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या कामात अडचणी निर्माण होत आहेत. ग्रामीण भागात चोरी,वाद-विवाद,बेकायदेशीर हालचाली यावर नियंत्रण ठेवण्यासाठी ग्राम पोलीस पाटील यांची उपस्थिती अत्यंत आवश्यक आहे.या रिक्त पदांमुळे गावातील नागरिकांना पोलीस प्रशासनाशी समन्वय साधताना अडथळे येत आहेत. त्यामुळे सांगोला तालुक्यातील सर्व रिक्त ग्राम पोलीस पाटील पदांची |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | तातडीने भरती करून त्या ठिकाणी पात्र उमेदवारांची नियुक्ती करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अनंत (बाळा) नर** |
| (९) | १३६४ | १० | जोगेश्वरी पूर्व विधानसभा क्षेत्रातील मोठया प्रमाणात अमली पदार्थ्याची विक्री सुरु असणे, या परिसरात इस्माईल युसुफ सारखी कॉलेज असल्याने महाविदयालयीन विदयार्थी ,या भागातील तरुण वर्ग यांच्या अधीन होऊ लागणे, तसचे गदुर्ल सर्रासपणे वावरत असलयाने महिलांना / मुलींना रस्या◌ारवरुन फिरणे मुस्कील होणे, मुलींची छेडछाड ,अश्लील चाळे आदि प्रकार होत असणे, परिणामी नागरिकांमध्ये प्रचंड घबराटीचे व चितेचे वातावरण असणे, याबाबत शासनाने लक्ष घालून यास आळा बसण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्याचीआवश्यकता, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही व उपाययोजना. |
| (१०) | १३६६ | १० | जोगेश्वरी पूर्व विधानसभा मतदारसंघातील एमआयडीसी पोलीस ठाण्याची सध्याची इमारत जुनी आणि अपुरी असल्याने तिच्या जागी अत्याधुनिक सोयी-सुविधांनी युक्त अशा नवीन इमारतीची असलेली मागणी, प्रस्तावित नवीन इमारतीमध्ये पोलीस कर्मचारी आणि अधिकाऱ्यांसाठी स्वतंत्र दालने, कोठडी, सीसीटीव्ही नियंत्रण कक्ष, विश्रांती गृह आणि अभ्यागतांसाठी प्रतीक्षा कक्षाचा समावेश असणे,राज्य सरकार आणि पोलीस गृहनिर्माण मंडळाकडून अशा प्रकल्पांना मंजुरी दिली जात असणे. जोगेश्वरी पूर्व विभागातील विविध विकास कामांच्या संदर्भात या पोलीस स्टेशनच्या पुनर्विकासाचा मुद्दा स्थानिक लोकप्रतिनिधींकडून सातत्याने मांडला असणे,परिसरातील पुनर्विकास होत असणे व जोगेश्वरी पूर्व भागात सध्या मोठ्या प्रमाणावर पुनर्विकासाचे प्रकल्प सुरू आहेत, ज्यामध्ये पूनम नगर जवळील PMGP कॉलनीच्या पुनर्विकासाचाही समावेश असणे. या परिसरातील वाढती लोकसंख्या आणि औद्योगिकीकरण लक्षात घेता, पोलीस स्टेशनच्या सुरक्षेच्या पायाभूत सुविधांचे आधुनिकीकरण करणे महत्त्वाचे ठरले असने इतर सुविधा: सध्याच्या पोलीस ठाण्यात व्हीलचेअर प्रवेशाची सोय आणि प्रसाधनगृहाची सुविधा उपलब्ध आहे. कार्यरत वेळ: हे पोलीस स्टेशन नागरिकांसाठी २४ तास खुले असणे यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना, |
| (११) | १३६७ | १० | जोगेश्वरी पूर्वमधील म्हाडा वसाहत आणि वनराई येथील पोलीस वसाहतींच्या इमारती ३० वर्षांहून अधिक जुन्या आणि जीर्ण झाल्या असणे, या इमारतींच्या पुनर्बांधणीचा मुद्दा विधिमंडळातही मांडण्यात येणे, राज्य मंत्रिमंडळाने जानेवारी २०२६ मध्ये सुमारे २०,००० कोटी रुपयांच्या ‘मुंबई पोलीस हाऊसिंग टाऊनशिप’ प्रकल्पाला मंजुरी दिली असणे. या अंतर्गत मुंबईतील ७५ पोलीस वसाहतींचा टप्प्याटप्प्याने कायापालट केला जाणार असून, जोगेश्वरी पूर्वमधील जुन्या वसाहतींचा यात समावेश असण्याची दाट शक्यता असणे,नवीन पोलीस स्टेशन |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | इमारतींच्या आराखड्यात आधुनिक लॉकअप्स (NHRC मार्गदर्शक तत्त्वांनुसार), स्वतंत्र तपास कक्ष, कॉन्फरन्स रूम, सीसीटीव्ही नियंत्रण कक्ष आणि महिलांसाठी स्वतंत्र सुविधांचा समावेश करण्याचे निर्देश देण्यात आले असणे,पोलीस स्टेशनच्या कार्यक्षेत्रातील पूनम नगर येथील पीएमजीपी (PMGP) कॉलनीच्या पुनर्विकासाचे काम म्हाडाने हाती घेतले असणे, यामुळे परिसरातील पायाभूत सुविधांमध्ये मोठी सुधारणा होत असणे, जोगेश्वरी पूर्व पोलीस स्टेशन सध्या गुंफा रोड (Caves Road), स्वामी कंपाउंड येथे कार्यरत असणे,. हे पोलीस स्टेशन २४ तास सुरू असणे,या मतदारसंघाच्या सुरक्षेसाठी मेघवाडी, एमआयडीसी (MIDC) आणि वनराई पोलीस ठाणी देखील महत्त्वाची भूमिका बजावत असणे पोलीस कर्मचारी आणि अधिकाऱ्यांसाठी ४५० ते ५०० चौ. फूट चटई क्षेत्राची आधुनिक घरे उपलब्ध होणार असणे,नवीन प्रशासकीय इमारतीमुळे पोलिसांच्या कामकाजात सुसूत्रता येईल आणि नागरिकांना चांगल्या सेवा मिळत असणे यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना, |
| (१२) | १३६८ | १० | महाराष्ट्र राज्य पोलीस दलाने पोलीस ठाण्यांच्या पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करण्यासाठी 'मुंबई पोलीस २.०' ही मोहीम हाती घेतली असणे,या अंतर्गत वनराई पोलीस स्टेशनमधील जुन्या डिटेक्शन रूम आणि कर्मचारी कक्षांचे नूतनीकरण करून तेथे वातानुकूलित (AC) यंत्रणा आणि अभ्यागतांसाठी आधुनिक सोयी करण्यात येत असणे,मुंबईतील प्रत्येक झोनमध्ये एक नवीन सायबर लॅब उभारण्याचे नियोजन असून, वनराई पोलीस स्टेशन ज्या झोनमध्ये येते, तेथेही ही अद्ययावत सुविधा उपलब्ध होण्याची शक्यता आवश्यकता असणे यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१३) | १३७० | १० | मुंबई पोलीस दलाच्या 'पोलीस २.०' उपक्रमांतर्गत जुन्या पोलीस ठाण्यांच्या इमारतींचे आधुनिकीकरण करण्यात येत असणे यामध्ये आरे पोलीस स्टेशनमधील अंतर्गत खोल्या, सीसीटीव्ही नियंत्रण कक्ष आणि अभ्यागतांसाठी प्रतीक्षा कक्षाचे नूतनीकरण प्रस्तावित असणे,वाढत्या सायबर गुन्ह्यांचा विचार करता, स्थानिक पोलीस ठाण्यांमध्ये स्वतंत्र सायबर डेस्क किंवा कक्ष स्थापन करण्यावर भर दिला जात असून, नूतनीकरण प्रकल्पात याला प्राधान्य दिले जात असणे,हे पोलीस ठाणे 'इको-सेन्सेटिव्ह झोन' (ESZ) मध्ये येत असल्याने, कोणत्याही मोठ्या बांधकामासाठी किंवा विस्तारासाठी सर्वोच्च न्यायालय आणि राष्ट्रीय हरित लवादाच्या (NGT) मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करावे लागते सर्वोच्च न्यायालयाने आरे कॉलनीतील ४०७ एकर जागेवर पायाभूत सुविधा प्रकल्पांना परवानगी दिल्याने, पोलीस ठाण्याच्या अद्ययावतीकरणातील तांत्रिक अडथळे कमी झाले आहेत सध्या उपलब्ध असलेल्या सुविधा होण्याची शक्यता आवश्यकता असणे यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (१४) | ११७१ | १०० | जोगेश्वरी पूर्व विधानसभा कार्यक्षेत्रात स्थानिक पोलीस ठाण्यांमध्ये (जोगेश्वरी, मेघवाडी पोलीस ठाणे) मनुष्यबळ कमी असल्यामुळे गुन्हेगारीवर नियंत्रण मिळवताना मर्यादा येत असल्याचा नागरिकांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत असणे, तसेच मुंबईत एकूण मंजूर पदांपैकी सुमारे २५% पदे रिक्त असणे, ज्यामुळे कार्यरत पोलिसांवर कामाचा ताण वाढत असून गुन्ह्यांच्या तपासावर परिणाम होत आहे पोलीस दलामध्ये मुंबई शहरामध्ये प्रत्येक पोलीस ठाण्यामध्ये मनुष्यबळ निम्म्यापेक्षा कमी असल्यामुळे स्थानिक पातळीवर अनुचित प्रकार तसेच गुन्ह्याचे प्रमाण वाढले असून त्यावर नियंत्रण राखण्यासाठी मनुष्यबळ मोठ्या प्रमाणात वाढवणे अत्यंत गरजेचे असणे, पोलिस दलातील मनुष्य बळ वाढविण्याकरिता तातडीने भरती प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी उपाययोजना करणे गरजेचे असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना |
| | | | **श्री. अमिन पटेल** |
| (१५) | १३०४ | १० | राज्यात एम.डी.ड्रग्ज, ब्राऊन शुगरची तस्करी मोठया प्रमाणात वाढली असणे, ड्रग्ज तस्करांचे थैमान माजले असून त्यांच्यावर नियंत्रण राहिले नसणे, ठाणे जिल्हयात नेसेखोरीचा बाजार झाला असणे, ठाणे जिल्हयात २ कोटी २१ लाख ८२ हजार एम.डी.ड्रग्ज पावडर शिळ डायघर पोलीसांनी जप्त केली असणे, शिळ डायघर (जि.ठाणे) पोलीस ठाण्याच्या हद्दीत ड्रग्ज तस्कर मोठया प्रमाणावर वास्तव्य करीत असणे, वसई या ठिकाणाहून एम.डी.ड्रग्जचा साठा व ८ कोटी रुपयाचे अमली पदार्थ साकीनाका पोलिसांनी जप्त केले असणे, मात्र पुढे कोणतीही कारवाई झाली नसणे, आंतरराष्ट्रीय हायड्रो गांजाचा वापर व तस्करी वाढली असणे, नवी मुंबई येथे कोकेण मोठया प्रमाणावर आढळून आले असणे, हायड्रो गांजा हवाई मार्ग थायलंड येथून येत असणे, मुंबई आंतराष्ट्रीय टोळी कार्यरत असणे याला पोलिस खतपाणी घालत असणे, परिणामी नागरिक व मुले व्यसनाधिन झाली असणे, नवीन पिडीस धोका निर्माण झाला असणे, या संदर्भात उपायोजना करण्याची आवश्यकता असणे याकडे शासनाने केलेले अक्ष्यम दुर्लक्ष परिणामी नागरिकांमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना . |
| (१६) | १३०५ | १० | मुंबईसह महाराष्ट्रात मागील काही महिन्यांपासून महिलांवर होणाऱ्या अत्याचारांमध्ये सतत वाढ होत असणे, अल्पवयीन मुलींपासून ते महिलांवर घडणाऱ्या अतिप्रसंगात क्रोर्याची परिसीमा गाठली जाणे, महिलांच्या सुरक्षेबाबत पुन्हा एकदा गंभीर प्रश्न निर्माण होणे, अश्या गुन्ह्यांमुळे मुंबईसह महाराष्ट्र हादरून जाणे, अश्या विकृत वासनेच्या व्यक्तींवर कठोर कायदेशीर कारवाई होण्याची महिला वर्गाची मागणी असणे, अश्या गुन्ह्यांशी संबंधित असलेले खटले प्रलंबित असणे, यामुळे गुन्हेगार मोकाट फिरत असणे, महिलांमध्ये खास करून अल्पवयीन मुलींमध्ये दहशतीचे वातावरण असणे, अल्पवयीन मुली तसेच महिलांच्या अपहरणाच्या घटनांमध्ये वाढ होणे त्यामुळे महिला वर्गात पसरलेले असंतोषाचे |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | वातावरण व नाराजीची भावना, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. नानाभाऊ पटोले** |
| (१७) | १३३२ | १० | साकोली, लाखनी व लाखांदूर तालुक्यातील अनेक पोलिस चौक्या भाडयाच्या इमारतीत चालवल्या जात असणे, ग्रामीण भागात कायदा- सुव्यवस्थेसाठी पोलिसांना स्वतंत्र, सुसज्ज आणि सुरक्षित इमारती नसणे, लाखनी व लाखांदूर येथे पोलिस कर्मचारी वसाहत नसणे साकोली , लाखनी व लाखांदूर शहरामध्ये गर्दीचे टी-पॉईंट , चौक, बाजारपेठ, बसस्थानक,शाळा परिसर येथी सीसीटीव्ही कॅमरे उपलब्ध नसणे, गुन्हे रोखण्यासाठी व तपास सुलभ करण्यासाठी "स्मार्ट सर्व्हेलन्स सिस्टीम योजना " अंतर्गत सीसीटीव्ही नेटवर्क नसणे, साकोली येथे उपविभागीय पोलीस अधिकारी (SDPO)कार्यालयाची प्रशासकीय इमारत उपलब्ध नसणे, युवकांमध्ये वाढत असलेल्या गुन्हेगारी प्रवृत्तीवर नियंत्रणासाठी पोलीस विभागाने शाळा-कॉलेजमध्ये मार्गदर्शन शिबि आयोजीत करणे, त्यामुळे शासनाने याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. बापूसाहेब पठारे** |
| (१८) | १३८४ | १० | येरवडा कारागृहातील कैद्यांना वैद्यकीय तपासणीसाठी ससून रुग्णालयात नेले जाते. मात्र या प्रक्रियेदरम्यान कैदी रुग्णालयातून फरार होण्याच्या अनेक घटना घडत असल्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत आहे. तसेच कैद्यांना रुग्णालयात ने-आण करण्यासाठी मोठ्या प्रमाणात पोलिस बंदोबस्त लावावा लागतो, ज्यामुळे मनुष्यबळ, वेळ व आर्थिक साधनसंपत्तीचा मोठ्या प्रमाणात वापर होतो. या पार्श्वभूमीवर येरवडा कारागृह परिसरातच कैद्यांच्या वैद्यकीय तपासणीसाठी स्वतंत्र रुग्णालय उभारल्यास कैदी फरार होण्याच्या घटनांना आळा बसेल तसेच पोलिसांचा वेळ व खर्चाची बचत होईल. याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. सुनिल प्रभू** |
| (१९) | १३८० | १० | मुंबईतील अंधेरी, जोगेश्वरी ते दहिसर, मागाठाणे या परिसरात रात्रीच्या वेळी अज्ञात इसमाच्या टोळीकडून, जेसीबीच्या सहाय्याने मुंबई महापालिकेच्या रस्त्याखालून गेलेल्या महानगर टेलीफोन निगम लि.( MTNL) च्या केबल वायर्स, रस्ता खोदून अनधिकृतपणे काढण्यात येऊन व त्याची विक्री करुन, कोटयावधी रुपयाचा अर्थिक घोटाळा करण्यात येणे, यामध्ये ओशीवरा पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्यांनी केवळ 10 ते 12 व्यक्तीवर गुन्हा दाखल करुन, उर्वरीत 15-20 व्यक्ती फरार असल्याची नोंद दाखल गुन्हयामध्ये करण्यात येणे, सदरहू प्रकरणी ओशिवरा, वर्सोवा, चारकोप आणि दहिसर पोलीस ठाण्यात दि.10.12.2025 रोजीच्या सुमारास गुन्हा दाखल करण्यात येऊनही, अद्याप याबाबत चौकशी करुन,दोषी विरुध्द कोणतीच कारवाई |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | करण्यात न येणे, सदर केबल चोरी रॅकेटमध्ये राजकीय व्यक्तींचा सहभाग व यामध्ये मराठी युवकांना चुकीच्या पध्दतीने सहभागी करुन घेण्याचा गंभीर प्रकार उघडकीस आल्याने, सदरहू प्रकरणाची शासनाने सखोल चौकशी करुन, सुत्रधारासह संपूर्ण टोळी उध्दवस्त करुन, कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२०) | १३९६ | १० | जि.ठाणे कळवा येथील राज्य शासनाच्या जमिनीवर मे.अमृत बिल्डर या भागीदारी असलेल्या 5 विकासकांनी श्री अमृत पार्क सोसायटीमधील 112 सदनिकाधारकांची सुमारे 44 कोटी रुपयाची अर्थिक फसवणूक केल्या प्रकरणी कळवा पोलीस स्टेशनमध्ये दि.4.10.2025 रोजी विकासका विरुध्द गुन्हा दाखल करण्यात येणे, या इमारतींचा पुनर्विकास करण्याकरिता रहिवाश्यांनी जमीन नावावर करण्याची प्रक्रिया सुरु केली असतांना 36 वर्षापूर्वी 3 इमारती बांधून तेथील रहिवाश्याची 44 कोटी रुपयांची अर्थिक फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस येणे, याबाबत कळवा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करुनही अद्याप, पोलीसांनी विकासका विरुध्द कोणतीच कार्यवाही न करता प्रकरण अर्थिक संगनमताने दडपून टाकण्यात येणे, सदर प्रकरणाचा तपास ठाणे अर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात येऊनही, अद्याप यावर कोणतीच कार्यवाही न करण्यात येणे, यामुळे अर्थिक फसवणूक झालेल्या 112 सदनिका धारक कुटुंबावर झालेला अन्याय, याबाबत शासनाने कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२१) | १४३५ | १० | मुंबईतील सँडहर्स्ट रोड (प). स्टेशन लगत पोददार बिल्डिंग क्र.२, शिंगजी भवन,लक्की मेंशन, सफीया मंजिल, नवाब मेंशन, सॅमसन बिल्डिंग दरम्यानच्या फुटपाथवर अनिधिकृत बेकायदेशीर पणे शेकडो वाघरी कुटुंबीय दिवसरात्र फुटपाथवर वास्तव्य करीत असणे. जेवण बनविणे,हार बनविणे, रात्रीचे तेथेच झोपणे व मोठ मोठया आवाजात रात्री भांडत करीत असल्याने त्याचा येथील इमारतीतल करदात्या रहिवाशी जनतेस नाहक त्रास सहन करावा लागत असणे तसेच रेल्वे स्टेशनला जाता येताना देखील या लोकांचा नागरिकांना रहदारी करण्यास त्रास होत असणे. या संदर्भात स्थानिकांनी डोंगरी पोलिस ठाण्यात तक्रार केली असणे याबाबत शासनाने केलेली कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. सुनील राऊत** |
| (२२) | १३३६ | १० | माझ्या विक्रोळी विधानसभा मतदार संघातील भांडूप, कांजुरमार्ग, विक्रोळी, कन्नमवार नगर, पवई इत्यादि ठिकाणच्या परिसरात मोठया प्रमाणात ड्रग्ज, अमली पदार्थ विक्रीचे सेवन व विक्रीचे प्रमाण वाढलेले असणे, याबाबत उपायुक्त यांना वारंवार पत्रव्यवहार करुनही अदयाप ठोस उपाययोजना न होणे, परिणामी युवा पिढी व्यवसाधीन होणे, अमली पदार्थ्याच्या सेवनाकरिता पैशाची गरज भागविण्यासाठी तरुण पिढी चोऱ्या, मारामारी, लुटमार आदि गुडप्रवृत्तीकडे वळणे, त्याचबरोबर |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | उदयानातील ड्रग्ज व अमली पदार्थ सेवन करण्याचे प्रकार वाढलेले असणे, यास आळा घालण्याच्या दृष्टीने अशा ठिकाणी सी.सी.टी व्ही.कॅमेरे, हॅायमॅक्स दिवे, पोलीस पेर्टोलिग वाढविणे, वेगळे क्वॅाड तयार करण्याची आवश्यकता असणे, प्रत्येक विभागात ॲटी ॲण्ड ड्रग तपासणी समिती स्थापन करण्याची आवश्यकता, एनडीपीएस कायदयाअंतर्गत नियमित कॉम्बिंग ऑपरेशन करण्याची आवश्यकता,याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, याबाबत सनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२३) | १३४४ | १० | माझ्या विक्रोळी मतदार संघातील प्रभाग क्र ११७ वात्सल्य ट्रस्ट ते इर्स्टन एक्सप्रेस हायवे वर सीसीटीव्ही बसविण्याबाबतची आवश्यकता, इर्स्टन एक्सप्रेस हायवे वर अपघाताचे वाढलेले प्रमाण, चो-या, लुटमार आदिमुळे पोलीस उपआयुक्त परिमंडळ -७ यांना कळवूनही अदयाप दखल न घेणे, याबाबत तातडीने लक्ष घालून प्रभाग क्र.११७ वात्सल्य ट्रस्ट ते इर्स्टन एक्सप्रेस हायवे वर सीसीटीव्ही बसविण्याबाबत करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाने केलेली उपाययोजना. |
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (२४) | १३०८ | १० | मुंबईतील मालाड (प.) चारकोप नाका येथील मुस्लीम व ख्रिस्ती दफनभूमी तसेच हिंदू स्मशानभूमी परिसरातील शंकर मंदिरातील घंटा चोरीला गेल्याचे दि.३/२/२०२६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, या परिसरात चोरटयांचा मोठया प्रमाणावर वावर वाढला असणे, त्यामुळे येथील नागरिक असुरक्षित होणे, त्यामुळे या परिसरात सी.सी.टी.व्ही. लावणे अत्यंत गरजेचे असणे, परंतु त्यावरील कारवाईस होत असलेला विलंब, परिणामी येथील जनतेत व्यक्त होणारा असंतोष व नाराजीची भावना, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२५) | १३०९ | १० | कल्याण (पूर्व), जिल्हा-ठाणे येथील वाढती लोकसंख्या, नागरी विस्तार व वाढत्या गुन्हेगारीचा आलेख लक्षात घेता, सध्या कार्यरत असलेले कोळसेवाडी पोलीस स्टेशनची अपुरी जागा, पुरेशी अधोसंरचना नसल्यामुळे कार्यक्षमतेत अडथळा निर्माण होत असल्याचे माहे डिसेंबर, २०२५ वा त्यादरम्यान निदर्शनास येणे, १०० फुटी रोड (कल्याण पूर्व) परिसरात पोलीस ठाणे व पोलीस वसाहतीसाठी स्वतंत्र भूखंड आरक्षित करुन तो गृह विभागास सुपूर्द करण्याची मागणी स्थानिक जनतेकडून व लोकप्रतिनिधींकडून करण्यात येणे, यासंदर्भात पोलीस आयुक्त, ठाणे यांनी कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांच्याकडे भूखंड प्राप्तीसाठी अधिकृत प्रस्ताव सादर करुनही निर्णय घेण्यास जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याची बाब निदर्शनास येणे, कल्याण (पूर्व) येथे पोलीस ठाणे व पोलीस वसाहत उभारण्यासाठी तात्काळ भूखंड प्राप्त करुन देण्याच्या दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: बी-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ३०५५, मार्ग परिवहन**<br>**रूपये:- २५,००,००,०७,०००/-**<br>**डॉ. बाबासाहेब देशमुख** |
| (२६) | १३१४ | १० | सांगोला तालुका हा सोलापूर जिल्ह्यातील एक महत्त्वाचा तालुका असून दररोज मोठ्या प्रमाणावर प्रवासी एस.टी. बससेवेचा वापर करतात. मात्र सांगोला येथील बस स्थानकाची इमारत जुनी व अपुरी असून प्रवाशांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. बस स्थानकात पुरेशा प्रतीक्षालयाची व्यवस्था नाही, स्वच्छतागृहे अपुरी आहेत, पिण्याच्या पाण्याची सुविधा व्यवस्थित उपलब्ध नाही तसेच बस स्थानक परिसरात अंतर्गत रस्ते, प्रकाशयोजना व इतर मूलभूत सुविधा अपुऱ्या आहेत. त्यामुळे प्रवाशांना विशेषतः महिला, ज्येष्ठ नागरिक व विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणावर गैरसोयी सहन कराव्या लागत आहेत. या बस स्थानकाचे अंतर्गत बांधकाम, प्रशस्त प्रतीक्षालय, स्वच्छतागृहे, पिण्याचे पाणी, डिजिटल माहिती फलक, प्रकाशयोजना तसेच इतर प्रवासी सुविधांची उभारणी करण्यासाठी आवश्यक निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. गजानन लवटे** |
| (२७) | १२३९ | १०० | अंजनगाव सुर्जीला बस स्थानक होऊन जवळपास 33 वर्षे झाली. या बस स्थानकाचा कारभार दर्यापूर आगारातून होतो. अंजनगाव सुजी बस स्थानकात आगारा करिता मोठी जागा उपलब्ध असताना अंजनगाव सुर्जी तालुक्याची गरज लक्षात घेता अंजनगाव सुर्जी येथे आगार कधी होणार 33 वर्षानंतर सुद्धा जागा उपलब्ध असताना आगार झाले नसणे, याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष. याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: बी-७**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ३०५१, बंदरे व दीपगृह**<br>**रूपये:- ४,६५,३६,००,०००/-**<br>**डॉ. बाबासाहेब देशमुख** |
| (२८) | १२६० | १० | रायगड जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यातील आक्षी, वरसोली व रेवदंडा या किनारपट्टी भागात मोठ्या प्रमाणावर मासेमारी व्यवसाय केला जातो. या भागातील मच्छीमार बांधवांना नौका लावण्यासाठी, मासळी उतरविण्यासाठी व सुरक्षित वाहतुकीसाठी आवश्यक जेट्टीची सुविधा अपुरी आहे. जेट्टी नसल्यामुळे मच्छीमारांना समुद्रकिनाऱ्यावरून मासळी उतरवताना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागते, तसेच खराब हवामानात नौकांचे नुकसान होण्याची शक्यता असते. या भागात जेट्टी बांधल्यास मच्छीमार बांधवांना सुरक्षित सुविधा मिळून मासेमारी व्यवसायाला मोठा हातभार लागेल व स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळेल. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | त्यामुळे आक्षी, वरसोली व रेवदंडा येथे जेट्टी बांधण्यासाठी आवश्यक निधीची तरतूद करून कामे तातडीने हाती घेण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: बी-१०**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ४०७०, इतर प्रशासनिक सेवा वरील भांडवली खर्च**<br>**रूपये:- १,४८४,८६,७९,०००/-**<br>**श्री. बापूसाहेब पठारे** |
| (२९) | १४०३ | १० | लोहगाव, पुणे येथे ११७ एकर जागेत सन २०१० मध्ये मेगा पोलीस हाऊसिंग प्रकल्प राबविण्याचा निर्णय घेण्यात आला. मोरया कंपनी व एमपीएमसी यांच्या संयुक्त विद्यमाने एसपीव्ही स्थापन करून प्रकल्प राबविण्यात येत असून पोलिसांकडून ३०० कोटी रुपयांहून अधिक निधी जमा करण्यात आलेला आहे. प्रकल्पात ५२४८ सदनिका व २०० दुकाने देण्याचे बंधनकारक असतानाही हा प्रकल्प सन २०१६ पासून रखडलेला आहे. विकासक व काही अधिकाऱ्यांच्या हस्तक्षेपामुळे प्रकल्पास अडथळे निर्माण होत असून पोलीस कर्मचारी अद्यापही घरांपासून वंचित आहेत. याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना तसेच प्रकल्पास अडथळा निर्माण करणाऱ्या संबंधित विकसक व अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करावी. |

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : ११ मार्च, २०२६**

**डॉ. विलास आठवले,**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) गृह विभाग
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई